सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ९३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## दहशतवाद विरोधी लढाईत भारताला पूर्ण पाठिंबा अमेरिकेची घोषणा, ट्रम्प-मोदींमध्ये चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नवी दिल्ली**

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अनेक देशांनी भारताचं समर्थन केले आहे. सर्वांनी एकाच सूरात दहशतवादविरोधातील भारताच्या लढाईला पाठिंबा दिला आहे. या ताकदवान देशात अमेरिकेचाही समावेश आहे. ज्यांनी नुकतेच निवेदन जारी करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी आधीच या मुद्द्यावरून पंतप्रधान मोदींसोबत फोनवरून संवाद साधला आहे.



अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॅमी ब्रूस यांनी पत्रकार परिषद घेतली. त्याआधी अमेरिकेने या मुद्द्यावर भारत आणि पाकिस्तान दोघांची संवाद साधला. या पत्रकार परिषदेत ब्रूस म्हणाले की, पहलगाम हल्ल्यानंतर दोन्ही देशातील तणाव पाहता ट्रम्प प्रशासन दोन्ही देशातील सरकारच्या संपर्कात आहे. आम्ही या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. परराष्ट्र सचिवांनी भारताचे मंत्री एस जयशंकर आणि पाकिस्तानी पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्याशी चर्चा केली. मागील आठवड्यात राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांचेही पंतप्रधान मोदींसोबत बोलणे झाले. दहशतवादविरोधी लढाईत अमेरिका भारतासोबत ताकदीनं उभे राहील. पंतप्रधान मोदींना आमचा पाठिंबा आहे असं ट्रम्प यांनी म्हटल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच दोन्ही देशांनी जबाबदारीनं ही समस्या सोडवण्याच्या दिशेने काम करावे. ज्यातून दक्षिण आशियात दीर्घकाळ शांतता आणि प्रादेशिक स्थिरता कायम राहील. आम्ही अनेक पातळ्यांवर दोन्ही देशातील सरकारशी बोलत आहोत असंही अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने म्हटलं. जेव्हा त्यांना विचारले, तणाव कमी करण्याच्या दृष्टीने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद मिळतोय का, त्यावर ब्रूस यांनी उत्तर दिले. आम्ही देशांकडे जबाबदारीने समस्येवर तोडगा काढण्याची मागणी केल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले.दरम्यान, अमेरिकेचे हे विधान जम्मू काश्मीर इथं एलओसीवर पाकिस्तानद्वारे शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जातेय त्यावेळी आले आहे. भारताने सीमेपलीकडे दहशतवाद्यांना खतपाणी देणाऱ्या पाकिस्तानविरोधात कठोर पाऊले उचलली आहे. त्यात सिंधु जल कराराला स्थगिती देणे, अटारी बॉर्डर बंद करणे, पाकिस्तानी उच्चायुक्तांना परत पाठवणे, तिथली कर्मचारी संख्या कमी करणे यासारखे अनेक निर्णय भारताकडून घेण्यात आले आहेत.

## पहलगाममध्ये हल्ला करणारे दहशतवादी अजून काश्मीरमध्येच? चौघांचा कट एनआयएने आणला समोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि,२पहलगाम**

पहलगाम येथे झालेल्या प्राणघातक दहशतवादी हल्ल्याला एका आठवड्याहून अधिक दिवस झाले असून त्याबाबत अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. सुरक्षा दलाकडून दहशतवाद्यांविरोधात जोरदार मोहिम राबवण्यात येत आहे. पहलगाम हल्ल्यात चार दहशतवाद्यांनी २६ जणांची गोळ्या झाडून हत्या केली होती. राष्ट्रीय तपास यंत्रणेने या प्रकरणाचा तपास सुरु केला असून महत्त्वाची बाब समोर आली आहे. पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेले दहशतवादी अजूनही दक्षिण काश्मीरमध्ये लपलेले असल्याचे ठोस संकेत मिळाल्याचे एनआयएचे म्हणणं आहे.



जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांबद्दल नवीन माहिती समोर आली आहे. हल्ल्यात सहभागी असलेले दहशतवादी अजूनही सक्रिय असल्याचे एनआयएच्या तपासातून समोर आलं आहे. मात्र भारतीय लष्कर किंवा जम्मू-काश्मीर पोलिसांनी याबद्दल अधिकृतपणे कोणतीही माहिती दिलेली नाही. पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांनी एप्रिलच्या पहिल्याच आठवड्यात बैसरन व्हॅलीमध्ये प्रवेश केला होता. ते योग्य संधीची वाट पाहत होते. २२ एप्रिल रोजी त्यांनी बैसरन व्हॅलीमध्ये पर्यटकांची हत्या केली आणि पळ काढला.

इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, एनआयएच्या सूत्रांनी दावा केला की पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेले दहशतवादी दक्षिण काश्मीरमध्ये लपून बसले आहेत. या भागात आणखी दहशतवादी लपून बसल्याची माहिती देखील समोर आली आहे. बैसरनमधील हल्ल्यादरम्यान इतर दहशतवादी काही अंतरावर होते आणि त्यांनी कव्हर फायर देऊन त्या दहशतवाद्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला असावा, असा संशय एनआयएला आहे.

## वैदिक मंत्रोच्चाराने उघडले केदारनाथ मंदिराचे दार; सर्वत्र ‘बम बम भोले’चा जयजयकार

### मंदिराला १०८ क्विंटल फुलांनी सजविले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि,२ देहारादून**

देवभूमी उत्तराखंडमधील केदारनाथ धामचं कपाट विधी पूजनासह शुक्रवारी सकाळी ७ पासून भाविकांसाठी खुले करण्यात आले आहे. या सोहळ्यात मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी हेदेखील उपस्थित होते. पुजाऱ्यांना वैदिक मंत्रोच्चार करत आणि भाविकांच्या बम बम भोले या जयजयकारात मंदिराचे दरवाजे उघडण्यात आले. गुरुवारी बाबा केदार यांची पंचमुखी पालखी केदारनाथ धामला पोहचली. केदारनाथाचं दर्शन करण्यासाठी जवळपास १५ हजाराहून अधिक भाविक तिथे दाखल झाले होते. आज सकाळी मंदिराचे दरवाजे उघडले तेव्हा भक्तांच्या हर हर महादेवच्या जयजयकाराने परिसर दुमदुमून गेला.

केदारनाथ मंदिराचे कपाट उघडण्याच्या सोहळ्यासाठी मंदिराला १०८ क्विंटल फुलांनी भव्यप्रकारे सजवण्यात आले होते. गुरुवारी राज्याचे डीजीपी दीपम सेठ आणि अप्पर पोलीस महासंचालक वी मुरूगेशन यांनी श्री बद्रिनाथ आणि केदारनाथ धाम याठिकाणी पाहणी करत



सुरक्षा व्यवस्था आणि अन्य तयारीचा आढावा घेतला. यंदा केदारनाथ यात्रेत गर्दीचं नियोजन करण्यासाठी टोकन व्यवस्था लागू करण्यात आली आहे. टोकन काऊंटर वाढवणे, पीए सिस्टममधून भक्तांची माहिती, स्क्रिनवर स्लॉट आणि नंबर जारी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एटीएस, पॅरा मिलिट्री दल हेदेखील सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहे.

**मंदिर परिसरात मोबाईलवर बंदी**

केदारनाथ यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना गाईडलाईन्स जारी करण्यात आली आहे. केदारनाथ मंदिर परिसरात ३० मीटरमध्ये मोबाईलचा वापर करण्यास मनाई आहे. रिल अथवा फोटो शूट करताना कुणी आढळला तर त्याचा मोबाईल जप्त करण्यात येणार असून ५ हजार रुपये दंडही आकारला जाणार आहे. दरवर्षी हिवाळ्यात होणाऱ्या जोरदार हिमवृष्टीमुळे केदारनाथ मंदिराचे कपाट बंद केले जाते. उन्हाळा सुरू होताच पुन्हा कपाट उघडले जाते.

## पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानला धास्ती, भारतीय गाण्यांवर घातली बंदी

### लता मंगेशकर, मोहम्मद रफी, किशोर कुमार आणि मुकेश यांच्या गाण्यांना बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२कराची**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव शिगेला पोहचलाय. भारताकडून पाकिस्तानची चारी बाजूने कोंडी करण्याचा प्रयत्न केला जातोय. भारताच्या कडक इशाऱ्यानंतर पाकिस्तानमधूनही प्रत्युत्तर देण्यात येत आहे. पाकिस्तानमध्ये भारतीय गाण्यावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आलाय. पाकिस्तानी एफएमवर यापुढे भाराताची गाणी वाजणार नाहीत. पाकिस्तान ब्रॉडकास्ट असोशिएशनने हा आवाज घेतलाय. लता मंगेशकर, मोहम्मद रफी, किशोर कुमार यांच्या गाण्यावर पाकिस्तानवर बंदी घालण्यात आली आहे.

पहलगामध्ये दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला, त्यामध्ये २६ निष्पाप पर्यटकांचा जीव गेला होता. या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील तणाव वाढलाय. दोन्ही देशांकडून कारवाईचा इशारा देण्यात येतोय. पाकिस्तानकडून भारतीय गाण्यावर



बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आलाय. याबाबतचे अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आलेय.१ मे २०२५ रोजी पाकिस्तान सरकारने भारतीय गाण्यावर बंदी घालण्यासंदर्भात अधिसूचना जारी केली. या प्रसिद्धीपत्रकात म्हटलेय की, पाकिस्तानात आता बॉलिवूड गाण्यांवर बंदी घालण्यात आली आहे. यापुढे पाकिस्तानी एफएम रेडिओ स्टेशनवर भारतीय गाणी वाजवली जाणार नाहीत. हा निर्णय संपूर्ण देशाचा विचार करून घेण्यात आला आहे.

**पाकिस्तानात कोणत्या गायकाची गाणी वाजायची?**

पीबीएने तात्काळ प्रभावाने देशभरातील एफएम रेडिओ केंद्रांवर भारतीय गाण्यांचे प्रसारण बंद केले आहे. लता मंगेशकर, मोहम्मद रफी, किशोर कुमार आणि मुकेश यांसारख्या दिग्गज गायकांची गाणी पाकिस्तानात लोकप्रिय आहेत आणि ती दररोज एफएम रेडिओवर वाजवली जातात. यापुढे या गाण्यावर बंदी घालण्यात आली आहे, असे पाकिस्तान प्रसारण संघटनेचे (पीबीए) महासचिव शकील मसूद यांनी सांगितले. माहिती मंत्री अत्ता तरार यांनी पीबीएच्या निर्णयाचे कौतुक केले आहे.

## तरुणांना संधी, राज्यात येणार यॉर्क आणि ऑस्ट्रेलिया विद्यापीठ; मुख्यमंत्री फडणवीसांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

वेव्हज जगातील अतिशय मोठा प्लॅटफॉर्म सुरु झाला असून त्याचे यजमानपद महाराष्ट्राला देण्यात आले आहे. आज महाराष्ट्राने वेव्हजच्या दृष्टीने काही एमओयू सुरु केले आहे. ४३ कंपन्यांचा हा इंडेक्स आहे, गुंतवणूक करण्यासाठी हे मोठं पाऊल आहे. असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच आज दोन विद्यापीठांसोबत करार करण्यात आला आहे. राज्यात जगातील १०० विद्यापीठ जे येतात ते आपण आणणार आहोत.

यॉर्क विद्यापीठ आणि ऑस्ट्रेलिया विद्यापीठ राज्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यॉर्क विद्यापीठ आणि ऑस्ट्रेलिया विद्यापीठ राज्यात



१५००-१५०० कोटी रुपयांची गुंतवणुक करणार असल्याची देखील माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. याच बरोबर आणखी ४ विद्यापीठसोबत चर्चा सुरु आहे.

आम्ही प्राईम फोकस सोबत एक एमओयू केला आहे. ते एक फिल्मसिटी ते तयार करत आहेत. त्यांची राज्यात जवळपास ३ हजार कोटी गुंतवणूक होणार आहे. यामुळे २ हजार ५०० जणांना रोजगार मिळणार असेही फडणवीस म्हणाले. एमओयूच्या मदतीने जगातील सर्वात महागडे तंत्रज्ञान आणि कोणताही चित्रपट आपल्याकडे तयार करता येणार आहे. मला असं वाटतं की वेव्हज ह्या प्लॅटफॉर्म तयार झाला त्यातून ही गुंतवणूक आली आहे.

फिल्मसिटी म्हणजे तंत्रज्ञान आहे, शुटिंग प्रोडक्शन आणि पोस्ट प्रोडक्शन देखील असेल. विद्यापीठांचे ऑफ शोअर कॅम्पस तयार होतील. जे लोकं जाऊ शकत नाही त्यांना त्याच दर्जाचे शिक्षण आता आपल्याकडे मिळेल. रोजगाराची संधी सर्वाधिक आपल्याला मिळणार आहे. कन्टेटचं कन्झम्शन देखील सर्वाधिक आपल्याकडे आहे. असं देखील मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## पाकिस्तानने घेतली भारताची भीती! पीओकेमधील हॉटेल्स अन् गेस्ट हाऊसमध्ये सैन्य; मदरसे बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२लाहोर**

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. पाकव्याप्त काश्मीर मध्येही भीतीचे वातावरण आहे, चौधरी अन्वर-उल-हक याने याबाबत संकेत दिले आहेत. जर परिस्थिती आणखी बिकट झाली तर या प्रदेशात आणीबाणी लागू केली जाऊ शकते, असे संकेत दिले आहेत.

भारताकडून संभाव्य लष्करी कारवाईच्या भीतीमुळे सुरक्षा परिस्थिती लक्षात घेता नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेजवळील संवेदनशील भागात पर्यटकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. यासोबतच धार्मिक मदरसे १० दिवसांसाठी बंद करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

भारताने आक्रमण केल्यास अन्न, औषधे आणि इतर आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी पूर्ण तयारी करण्यात आली आहे,



असा दावा पीओकेच्या पंतप्रधानांनी केला आहे. आपत्कालीन निधीत एक अब्ज रुपये हस्तांतरित करण्यात आले आहेत आणि हॉटेल्स, गेस्टहाऊस आणि लग्नगृहांच्या चालकांनी त्यांच्या मालमत्ता सैन्याला देण्याचे ठरवले आहे.

**मदरसेही बंद केले**

नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेच्या आसपासच्या संवेदनशील भागात असलेले मदरसे १० दिवसांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला आहे. भारत या संस्थांना दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे म्हणून संबोधून त्यांना लक्ष्य करू शकतो अशी भीती पाकिस्तानला आहे.

## अमरावती जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग मध्ये शासन निर्णयला बाजूला सावरून कामकाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी पदभरती/ जाहिरात/अधिसूचना असणार्या व नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या शिक्षक तथा कर्मचारी यांना ग्राम विकास विभाग १ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णय नुसार म. नागरी सेवा निवृत्त वेतन नियम १९८२ व म.नागरी सेवा निवृत्तवेतनाचे अंशराशिकरण नियम १९८४ लागू करणे तथा भविष्य निर्वाह निधी चे खाते उघडणे व पि ची कपात तात्काळ बंद करणे असे अभिप्रेत आहे व शासन निर्णय मध्ये स्पष्ट नमूद आहे सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर संबधित प्रस्ताव वर २ महिन्याच्या आत निर्णय घ्यावा मात्र शिक्षणाधिकारी प्राथमिक कार्यालय मध्ये गेल्या मागील ५ महिन्या पासून सदर ११९ प्रस्ताव प्रलंबित आहे शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्याशी सदर विषयाबाबत वारंवार पाठपुरावा करून सुद्धा प्रत्येक वेळेस नवीन कारण सांगून तारीख वर तारीख देत असून अजून ही संबधित फाईल त्याच्या विभातून समोर जात नाहीएकीकडे जुनी पेन्शन सर्वांना लागू व्हावी यासाठी संघटना सतत विविध आंदोलन तालुका ते राज्य पर्यंत करत असते त्यातूनच सबंधित शासन निर्णय निघून सुद्धा न्याय मिळत नसेल तर शिक्षक कर्मचारी यांनी प्रत्येक बाबीसाठी आंदोलन करावे का असा प्रश्न आता समोर उभा ठेवला आहे.सदर विषय जर लवकर मार्गी निघाला नाही तर महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना याबाबत धरणे आंदोलन जिल्हा परिषद समोर करेल असे संघटनेचे जिल्हाध्यक्ष गौरव काळे यांनी सांगितले.

## संपादकीय ......

# धर्मांध पाकिस्तानचा अपयशी विखार

सुमारे १५ वर्षांपूर्वी प्रसिद्ध अमेरिकन लेखक स्टीफन कोहेन यांनी 'द आयडिया ऑफ पाकिस्तान' नावाचे पुस्तक लिहिले होते. यामध्ये त्यांनी विचारले होते, पाकिस्तान नक्की काय आहे? 'दुष्ट राष्ट्र, गुन्हेगारी राष्ट्र, की अपयशी राष्ट्र' त्यांच्या मते, पाकिस्तान विचार म्हणूनच अपूर्ण आहे; कारण तिथे राष्ट्र म्हणून एकवाक्यता नाही. जनरल असीम मुनीर ज्याप्रकारे धर्मांधतेचा शंख फुंकून पाकिस्तानला एकसूत्रात बांधण्याचा प्रयत्न करत आहेत, त्याचा इतिहास संपूर्ण अपयशाचा आहे. मुनीर यांनी धर्मांधतेची धग पहलगामपर्यंत पोहोचवून आत्मघात केला आहे.धर्मांधतेचा राजकीय वापर हा गंभीर व संवेदनशील मुद्दा आहे. तो केवळ शांतता, सुरक्षा आणि मानवतेसाठीच नव्हे; तर लोकशाही व सामाजिक ऐक्यासाठीही मोठा धोका ठरतो. काश्मीरमध्ये पर्यटकांना धर्म विचारून गोळ्या घालण्याचा प्रकार ज्या धर्मांध मानसिकतेचे प्रतिबिंब आहे, तीच मानसिकता राजकीय हेतूंसाठी वापरून मोहम्मद अली जिना यांनी भारताचे विभाजन घडवून आणले. तेच धोरण आजही पाकिस्तानकडून भारताविरुद्ध चालू आहे आणि पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल मुनीर यांनी पुन्हा धर्मांधतेची धग काश्मीरच्या पहलगामपर्यंत पोहोचवली आहे.पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर सुमारे ३५ वर्षांनंतर, १९८० च्या दशकात, पाकिस्तानचे लष्करी हुकूमशहा जनरल झिया-उल-हक यांना एका पत्रकाराने विचारले होते की, पाकिस्तान भारताशी शत्रुत्व का जोपासतो? त्यावर झिया म्हणाले होते की, तुर्की किंवा इजिप्त या राष्ट्रांनी मुस्लिम ओळख जपली नाही, तरीही ते तुर्की आणि इजिप्शियनच राहतील; पण पाकिस्तानने इस्लामी ओळख किंवा अस्मिता दाखवली नाही, तर आमचा भारत होईल. झिया यांच्या या विधानातून पाकिस्तानच्या राजकीय मनोवृत्तीचे भयानक वास्तव दिसते. आज पाकिस्तानने आपल्या स्थापनेच्या आठव्या दशकात प्रवेश केल्यानंतरही, त्यांची ही मानसिकता बदललेली नाही.

काही दिवसांपूर्वी इस्लामाबाद येथे झालेल्या 'ओव्हरसीज पाकिस्तानी कन्व्हेन्शन २०२५'मध्ये पाकिस्तानचे जनरल मुनीर यांनी द्विराष्ट्र सिद्धांताची पुनरावृत्ती करताना असे म्हटले की, आपला धर्म, संस्कृती, रीतिरिवाज आणि महत्त्वाकांक्षा हिंदूंपेक्षा वेगळे आहेत. हे विधान म्हणजे जिना यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न होता. वास्तविक, जिना यांची धर्माधारित देशनिर्मितीची कल्पना सुरुवातीलाच सांस्कृतिकदृष्ट्या अमान्य ठरली होती. धर्म व संस्कृती यांना एकत्र बांधण्याचा अयशस्वी प्रयत्न केला जातो, तेव्हा राष्ट्राचा नाश अटळ असतो. धर्म ही ईश्वर, अध्यात्म, नैतिकता व जीवनोत्तर संकल्पनांवर आधारित श्रद्धा असते; तर संस्कृती म्हणजे जीवनशैली, भाषा, परंपरा, अन्न, पोशाख, कला, संगीत, सण आणि मूल्यांचा समावेश असलेली एक व्यापक सामाजिक अभिव्यक्ती असते. जिना यांनी अरब व तुर्कांच्या इस्लामशी भारतीय मुस्लिमांना जोडण्याचा प्रयत्न केला; परंतु सांस्कृतिकदृष्ट्या ती कृती संपूर्णपणे विसंगत होती. नंतरच्या पाकिस्तानच्या राजकीय नेतृत्वानेही या विकृत धर्माधारित अस्मितेचा वापर कवचासारखा केला; पण लोकशाहीसाठी हे कवच शाप ठरले, हे स्पष्ट झाले आहे.

पाकिस्तानात १९५६ मध्ये संविधान अस्तित्वात आले; पण केवळ दोन वर्षांतच संसदीय लोकशाही मोडीत काढण्यात आली. राष्ट्रपती इस्कंदर मिर्झा यांनी दोन वर्षांत पाच पंतप्रधान हटवले आणि १९५८ मध्ये संविधान रद्द करून देशात मार्शल लॉ लागू केला. लष्करप्रमुख अयूब खान यांना देशाचा प्रशासक बनवण्यात आले. फक्त ११ वर्षांतच पाकिस्तानची लोकशाही व्यवस्था उद्ध्वस्त होऊन लष्करी हस्तक्षेपाला खुले आमंत्रण दिले गेले. आज पाकिस्तान जगातील सर्वाधिक अशांत व असुरक्षित देशांमध्ये अग्रगण्य आहे. बलुचिस्तानसारख्या प्रांतात लष्करही पोहोचू शकत नाही. खैबर पख्तुनख्वा प्रांतात अफगाणिस्तान समर्थित दहशतवादी टोळ्या शासन करत आहेत. पाकिस्तानमध्ये सामुदायिक ऐक्य नाही आणि देशाच्या 'पाकिस्तानी' अस्मितेला तिथली सामान्य जनता स्वीकारत नाही.१९४० मध्ये लाहोर अधिवेशनात मोहम्मद अली जिना यांनी स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची मागणी मांडली होती. त्यावेळी मोठ्या मुस्लिम जनतेला जिना इस्लामी नायक वाटत होते; पण जिना यांच्या मृत्यूनंतर त्या देशाचे स्वप्न भंगले. पाकिस्तानची सर्वाधिक राजकीय ऊर्जा भारतविरोधी धोरणांमध्ये आणि कृत्यांमध्येच खर्च झाली. आजवर देश म्हणून पाकिस्तान आपली नीती, कायदा किंवा घटनात्मक अधिष्ठान प्रस्थापित करू शकलेला नाही. जनरल मुनीर ज्याप्रकारे धर्मांधतेचा शंख फुंकून पाकिस्तानला एकसूत्रात बांधण्याचा प्रयत्न करत आहेत, त्याचा इतिहास संपूर्ण अपयशाचा आहे. १९७१ मध्ये, अशाच प्रयत्नांमुळेच बांगला देश वेगळा झाला; पण तरीही पाकिस्तानी पंतप्रधान शरीफ हे जनरल मुनीर यांच्या भाषणावर तशाच उन्मादी टाळ्या वाजवत होते, जशा काही वर्षांपूर्वी जिना यांच्या सभांमध्ये वाजवल्या जात असत.

काश्मीरबाबत पाकिस्तानचा दुटप्पीपणा आता इस्लामी जगतालाही दिसून आला आहे. चीनच्या शिनजियांग प्रांतात उईगर मुस्लिमांवर अत्याचार होतात. तेथे रोजा ठेवण्यास मनाई आहे. स्त्रियांना बुरखा घालू दिला जात नाही, सार्वजनिक ठिकाणी नमाजबंदी आहे; तरी पाकिस्तान यावर मौन बाळगतो. त्याउलट भारत हा धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही देश आहे. काश्मीरमधील मुस्लिम नागरिकांनाही इतर भारतीय नागरिकांप्रमाणे धर्मपालनाचा पूर्ण अधिकार, तसेच मूलभूत सुविधा दिल्या जातात. मध्य पूर्वेतील मुस्लिम राष्ट्रांसाठी भारत हा अधिक विश्वासार्ह आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा भागीदार आहे. संयुक्त अरब अमिरात, कुवेत, कतार, ओमान, बहरिनसारख्या देशांनी काश्मीरच्या मुद्द्यावर पाकिस्तानच्या भूमिकेला पाठिंबा दिला नाही. इराण तर अनेकदा या मुद्द्याबाबत भारताच्या बाजूने उभा राहतो. कारण, पाकिस्तानची सुन्नी कट्टरता शिया समाजाचा छळ करणारी आहे. आज ज्या सौदी अरेबियाने पाकिस्तानला आर्थिक रसद दिली त्या देशासोबत भारताची आर्थिक भागीदारी वाढत आहे. सुमारे ६० लाख भारतीय सौदीत राहत असून, तेथील प्रगतीत मोठा सहभाग देत आहेत. हे भारताचे मोठे यश आहे..

# जमीन ओलावा राहील, पाणी बचतही होईल, असे करा कमी खर्चात आच्छादन

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

कृषी विशेष



जमिनीतील उपलब्ध ओलावा जास्त काळ टिकण्यासाठी आच्छादनाचा उपयोग केला जातो. गव्हाचा भुसा, साळीचे तणिस, ज्वारीचा टाकाऊ कडबा, उसाचे पाचट किंवा कोणत्याही पिकाचे टाकाऊ काड, झाडाचा पाला-पाचोळा या सर्व वस्तूंचा आच्छादनासाठी वापर करता येतो. पॉलिथिन पेपर किंवा प्लॅस्टिक, काही रासायनिक द्रव्ये, लहान-मोठे दगड किंवा मातीसुद्धा आच्छादनासाठी वापरता येते. फळझाडां मध्ये आच्छादन टाकल्याने बुंध्या जवळची जमीन झाकली जाते. जमिनीला वातावरणाती ल उष्णता मिळण्यास अडथळा होतो आणि त्यामुळे बाष्पीभवन बहुतांशी कमी होते. आच्छादनाने जमिनीचा जेवढा जास्तीत जास्त भाग झाकला जाईल, तेवढ्या जास्त प्रमाणात पाण्याची बचत होते. उन्हाळी हंगामात फळझाडांची पाण्याची गरज प्रति दिवशी प्रत्येक झाडांसाठी सुमारे ३० लिटरपर्यंत वाढते. यापैकी बरेचसे पाणी बाष्पीभवनामुळे जमिनीतून हवेत शोषले जाते. आच्छादनाचा वापर करून उन्हाळी हंगामात पाण्याची कार्यक्षमता वाढविता येते तसेच पाण्याचा बाष्पीभवणाद्वारे होणारा अपव्यय कमी होतो. आच्छादन पांढऱ्या रंगाचे असेल तर तापमान कमी होते व पाण्याची बचत वाढते. आच्छादन काळया रंगाचे असेल तर तापमान ५ ते ८ अंश सेल्सिअसने वाढते. प्लास्टिक किंवा पॉलिथिन पेपर वापरल्यासही तापमान वाढते. आच्छादन कमी प्रमाणात टाकल्यास बाष्पीभवनास कमी प्रमाणात आळा बसतो. मात्र आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात आच्छादन घातल्यास फळझाडांना हानी पोहोचण्याची शक्यता असते.अंतरानुसार एकरी ५ ते ७ टन आच्छादनाचा वापर करावा. शक्यतो आच्छादनासाठी उसाच्या पाचटाचा वापर करावा. हेच पाचट पुढील हंगामात जमीन नांगरणीबरोबर गाडल्यास त्याचे खत म्हणून चांगला फायदा होतो.

**- डॉ. कल्याण देवळाणकर, सेवा निवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## किती ती चिडचिड! तुमच्या रागावर आताच ठेवा ताबा नाहीतर हार्ट टॅकचा मोठा धोका

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक** - राग नेहमीच मनावर अधिराज्य गाजवतो. तुम्हालाही छोट्या छोट्या गोष्टींवर राग येतो का? जर तुमचं उत्तर हो तर तुमचे आरोग्य धोक्यात आहे. विशेषतः ते तुमच्या हृदयासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकतं.



तज्ज्ञांच्या मते, रागाचा परिणाम केवळ मनावर होत नाही तर तो शरीराच्या प्रत्येक भागावरही परिणाम करू शकतो. त्याचा हृदयावर सर्वात जास्त परिणाम होतो. जास्त रागावल्याने हार्ट टॅकचा धोकाही वाढतो.

जेव्हा आपल्याला राग येतो तेव्हा आपले शरीर तणावग्रस्त स्थितीत जातं. वाढलेलं एड्रेनालाईन आणि कॉर्टिसोलसारखे हार्मोनल बदल ब्लड प्रेशर वाढवतात. यामुळे हृदयाचे ठोके वाढू शकतात. जर ही स्थिती दीर्घकाळ राहिली तर हृदयावर अतिरिक्त दबाव येतो, ज्यामुळे हार्ट टॅकचा धोका वाढू शकतो.

युरोपियन हार्ट जर्नलच्या अॅक्यूट कार्डिओव्हस्कुलर केअरमध्ये प्रकाशित झालेल्या २०१४ च्या अभ्यासात असं आढळून आलं की रागाच्या उद्रेकानंतरच्या दोन तासांत हार्ट टॅकचा धोका जवळजवळ पाच पटीने वाढतो.

हार्वर्ड मेडिकल स्कूलमधील संशोधकांनी २०१५ च्या विश्लेषणात अधोरेखित केलं की राग वारंवार येणं हृदयाशी संबंधित अनेक घटनांना कारणीभूत ठरू शकतं, विशेषतः अशा लोकांमध्ये जे आधीच खराब जीवनशैली जगतात.

**ब्लड प्रेशर वाढतं-** रागाच्या वेळी शरीरात एड्रेनालाईनची लेव्हल वाढते, ज्यामुळे ब्लड प्रेशर वेगाने वाढतं. जर हे वारंवार घडत राहिलं तर हृदयावरील दाब वाढतो आणि हाय ब्लड प्रेशरचा धोका निर्माण होऊ शकतो. जास्त काळ हाय ब्लड प्रेशर राहिल्याने हार्ट टॅकचा धोका वाढतो.

**रक्ताच्या गुठळ्या तयार होणं-** रागाच्या भरात रक्तप्रवाह वाढतो आणि प्लेटलेट्स लवकर एकत्र चिकटू लागतात. यामुळे रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका वाढतो, जो हृदयासाठी धोकादायक ठरू शकतो. या गुठळ्यांमुळे हृदयाला होणारा रक्तपुरवठा विस्कळीत होऊ शकतो, ज्यामुळे हार्ट टॅक येऊ शकतो.

**हृदयाचे ठोके वाढणं-** जेव्हा तुम्ही रागावता तेव्हा तुमच्या हृदयाचे ठोके वाढतात. जर हे सतत होत राहिले तर हृदयाला जास्त काम करावं लागतं. यामुळे हृदयरोग होऊ शकतात.

**राग येऊ नये म्हणून काय करावं?**

राग आल्यावर दीर्घ श्वास घ्या, यामुळे हृदय शांत होण्यास मदत होते. नियमित व्यायाम करा, त्यामुळे ताण कमी होतो आणि हृदय निरोगी राहते.मेडिटेशनमुळे मानसिक शांती मिळते, ज्यामुळे रागावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. सकारात्मक विचारसरणी स्वीकारा. विश्रांती घ्या, जेणेकरून तुम्ही मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या आनंदी राहू शकाल.

# ग्रामजयंती महोत्सवानिमित्य यावली शहिद येथे शेतकरी प्रशिक्षण व मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२नांदगाव पेठ-** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मस्थळ स्मृती मंदिर यावली शहीद येथे २९ एप्रिल रोजी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अमरावती व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप हंगामपूर्व शेतकरी प्रशिक्षण व मेळावा आयोजित करण्यात आला होता.तालुका कृषी अधिकारी अमरावती प्रशांत गुल्हाने यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य शेतकऱ्यांच्या उपस्थितीत हा मेळावा यशस्वी पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामचंद्र कांडलकर (अध्यक्ष, स्मृती मंदिर यावली)हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच शिल्पा तुषारराव खवले,



उपसरपंच नितीन पाचघरे, पंकज देशमुख (अध्यक्ष, सेवा सहकारी सोसायटी), सुनील देशमुख (सचिव, स्मृती मंदिर), प्रशांत टाकरखेडे (शेतकरी सल्लागार समिती सदस्य) आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला केव्हीके दुर्गापूर येथील विषय विशेषज्ञ प्रफुल महल्ले यांनी संत्रा फळपीक व्यवस्थापन या विषयावर उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच डॉ. आनंद वरघट ( कृषी तज्ज्ञ, कृषी संशोधन केंद्र, एकार्जुना ,चंद्रपूर) यांनी खरीप पिक व्यवस्थापन, बीज उगम क्षमता चाचणी, बीज प्रक्रिया व एकात्मिक कीड व्यवस्थापन या विषयांवर सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वलगाव येथील मंडळ कृषी अधिकारी कु. निता कवाने, यांनी केले. कृषी सहाय्यक ज्योती ठाकरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत खरीप हंगाम पूर्व नियोजनाचे महत्त्व आणि हवामानातील बदलामुळे उद्भवणाऱ्या समस्यांबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी बीज उगम चाचणीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सुद्धा दाखवले. या कार्यक्रमाला यावली परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्तम प्रतिसाद दिला. शेतकऱ्यांनी खरीपपूर्व पीक व्यवस्थापनाबाबत मिळालेल्या माहितीबद्दल समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाचे आभार कु. शुभांगी बोंडे, कृषी पर्यवेक्षक आणि कु. रुपाली चौधरी यांनी मानले. रविंद्र वानखडे, सुनील लंगडे, रोशन खवले अतुल यावलीकर आणि मनोज चौधरी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले.

# गुरुकुंजामध्ये संपन्न झाला भव्य स्वरूपात ग्रामजयंती महोत्सव ग्रामनाथ शेतकऱ्यांचा भव्य सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२गुरुकुंज मोझरी:** राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा ११६ वा जन्मोत्सव अर्थात ग्रामजयंती महोत्सवाच्या रूपाने संपूर्ण भारतभर गुरुदेव सेवा मंडळाच्या अनेक शाखांच्या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करून संपन्न केला जातो, दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा गुरुकुंजात भव्य दिव्य स्वरूपामध्ये ग्राम जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्ताने सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री सुरेंद्र किसनराव भिवगडे, श्री विशाल राजेंद्र शेळके, श्री प्रमोद विनायकराव पांडे , अशोक रंगरावजी बायस्कर, नंदू नागोराव जी नागपुरे या पाच शेतकऱ्यांचा भव्य दिव्य असा महोत्सव समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला सत्काराचे स्वरूप



सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ , ग्रामगीता , राष्ट्रसंताची प्रतिमा, श्री गुरुदेव रस शाळेतील जीवनावश्यक औषधी व बच्चु कडू यांच्यातर्फे सर्व ग्रामनाथ शेतकऱ्यांना शेतकऱ्याला १००० रोख सहयोग राशी याप्रमाणे दिली, याप्रसंगी मान्यवर अतिथी विलासराव साबळे, दिलीपराव कोहळे, गुलाबराव खवसे, पुष्पक खापरे, नंदू नागपुरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महोत्सवामध्ये विशेष आर्थिक सहयोग देणाऱ्या दानदात्यांचा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव उद्धव वानखेडे यांनी केले तर आभार प्रदर्शन अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण दळवी यांनी मानले,

# 'विद्यापीठाचे वरतीमागून घोडे' दामटण्याचा प्रकार - डॉ. शांत विघे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शैक्षणिक पाठपत्रकाप्रमाणे महाविद्याल याला दि . २२ एप्रिल २०२५ पासून उंचावणे अवकाश देण्यत आला असताना आता दि . २८ एप्रिल २०२५ रोजी विद्यापीठाने केंद्राच्या तासिका भरून काढण्या फुलेल पत्र निर्गमित केले आहे . हा प्रकार म्हणजे वरातीमागून घोडे दामटण्याचा सोईस्कर प्रकार म्हंटले नुटागेचे , संत गाड बाबा अमरावती विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ . शांत विघे यानी व्यक्ती केला आहे . फक्त केंद्राच्या तासिका पूर्ण घडवून आणणे पत्र काढुन विद्यापीठ धरणावर भारी टाकून स्वतः: नामा निराळे राहण्याचा प्रयत्न करत आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने दिवसांक २८ एप्रिल २०२५ रोजी असमानता अधिसूचना क्रमांक ४८ निर्गमित केली आहे . शैक्षणिक वर्ष संपवूनच ही अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक होते . परंतु तसेच न करतो विद्यापीठाने परीक्षा सुरू एप्रिल १९२५ पासून सुरु ही अधिसूचना निर्गमित करणे म्हणजे आपल्यावरील जबादारी झटकन्याचा प्रकार होय.

शैक्षणिक वर्षाच्या पहा शैक्षणिक वेळपत्रक जाहीर करून त्याचे प्रभावळी लागू होणे आवश्यक असतो , हा संपूर्ण भाग प्राचार्यांच्या अत्यारित येत असला तरी विद्यापीठाने त्यावर अंकुश ठेवून तासिकांची नियोजन आणि सत्र परीक्षांचे नियोजन करणे गरजेचे असते , वास्तविक कार्य कार्य करते. २८ एप्रिल २०२५ ची अशी अधिसूचना स्वतः आणि प्राचार्यांना संभ्रमात टाकते. मुळातच विद्यापीठाचे सत्र सुरूच होत असते, तर मग असे पत्र काढतात हा महत्त्वाचा प्रश्न. आत्मा वर्गाची विनती आहे, कि २८ एप्रिल २०२५ रोजी अधिसूचना रद्द करा अशाप्रकारचे निवेदन कुलसचिव डॉ. अविनाश कर्नाटके यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. शांत विघे आणि डॉ. रवींद्र मुंद्रे यांनी निवेदन केले.पुढील सत्रापासून विद्यापीठाने शैक्षणिक जोडपत्राची व्यवसायिक लागू होण्याच्या दृश्ये पावले उंचावलेले अशी मागणी केली.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २ मे २०२५ शहर/ग्रामिण


## तिवसा येथे सामुदायिक प्रार्थना व सर्व धर्म संमेलन...

### दिल्ली येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य संमेलन घेण्याचा निर्धार



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२तिवसा** – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचचे संस्थापक अमर वानखडे यांच्या वतीने अमरावतीच्या तिवसा येथे ११६ वा ग्रामजयंती महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला याप्रसंगी भव्य सामुदायिक प्रार्थना ,सर्वधर्म संमेलन घेण्यात आले तथा विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम व्यक्तींचा सत्कार करण्यात आला होता, मानवता सर्वधर्म समभाव ग्रामविकास राष्ट्रभक्ती सर्व सामान्य लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून देणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची आज देशाला गरज आहे म्हणून देशाच्या राजधानीत दिल्ली येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन घेण्याचा निर्धार करण्यात आला, कार्यक्रमाला अमरावती मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे उपस्थित होते,सर्व धर्म समभवाचा संदेश देणाऱ्या तुकडोजी महाराज यांना अभिप्रेत असणाऱ्या सर्व समाजाचे धर्मगुरू यावेळी उपस्थित होते,

यावेळी सर्व समाजाच्या प्रार्थना यावेळी घेण्यात आला, आधी राष्ट्रप्रेम नतंर नंतर सर्व समाजाचा आदर कसा करायचा याची आठवण देखील या कार्यक्रमात करण्यात आली.

## जातीनिहाय जनगणनेतून प्रत्येक वर्गाला न्याय मिळणार-पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती** केंद्र शासनाने जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रत्येक घटकाचे प्रतिनिधित्व माहिती होण्यास मदत मिळणार आहे.

यातून आलेल्या संख्यात्मक आकडेवारीतून त्या-त्या घटकांसाठी विकासात्मक योजना राबविण्यास मदत होईल. यातून मागास वर्गासह प्रत्येक वर्गाला न्याय मिळणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.वरुड तहसील कार्यालयात आज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान घेण्यात आले.

यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सुधाकर कोहळे, उमेश यावलकर, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार आदी उपस्थित होते.श्री. बावनकुळे म्हणाले, शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवून त्यांचे जीवन



सुखकर करण्यात येत आहे. जिवंत सातबारा ही मोहीम राबवून सातबारावरील मृत्यू झालेल्यांची नावे वगळून केवळ जिवंत व्यक्तींच्या नावांचे सातबारे शेतकऱ्यांना घरपोच वितरित करण्यात येत आहे.शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला पांदण रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्यात येत आहे.

बंधारे बांधणे, नाला खोलीकरणनातून काढण्यात आलेले गौण खनिज या रस्त्यासाठी उपयोगात आणले जात आहे. शेतकऱ्यांना दुपारी १२ तास वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यासोबतच सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाचा फायदा प्रत्येक नागरिकांनी घ्यावा. प्रशासनाने ही त्यांना सहकार्य करून त्यांच्या तक्रारी येणार नाहीत याची काळजी घ्यावी. नागररिकांना शासनाच्या सुविधा मिळण्यास अडचणी येत असल्यास थेट संपर्क करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार उमेश यावलकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान, मतदान कार्ड वाटप, पीएम किसान सन्मान निधीची वाटप, ट्रॅक्टर वाटप आदी योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात आले.

## चार्जिंगला लावलेल्या मोबाईलचा स्फोट, कुटुंब थोडक्यात बचावले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अंजनगावसुर्जी** – मोबाईल फोन काळजीपूर्वक हाताळला नाही तर तो धोकादायक ठरू शकतो. जगभरात अचानक फोन ब्लास्ट होण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये, हे स्फोट प्राणघातक देखील ठरले आहेत. चार्जिंगला लावलेला मोबाईल फोन ब्लास्ट होण्याची घटना स्थानिक साईधामनगर येथे घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जिवीतहानी झालेली नाही.

साईधामनगर येथील संजय टाले यांचा घरी ही घटना सकाळी ११ वाजता घडली. मोबाईल चार्जिंगला लावलेला असताना त्याचा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज व आवाका एवढा मोठाहोता की संपुर्ण घरात कंपन झाले होते. स्फोटाच्या आवाजाने संजय टाले यांची पत्नी हॉलमध्ये आल्या असता मोबाईला आग लागलेलीत्यांना दिसली तसेच बाजूच्या कपड्यांनीसुद्धा पेट घेतला होता. त्यांनी प्लगचे बटन स्वीचऑफ केले व मोबाईलवर पाणी टाकले. सतर्कतेने मोठी हानी टळली. त्यावेळी घराच्या बेडरूममध्ये सुदैवाने कोणी नव्हते. संजय टाले यांनी सांगीतले की, मोबाईलच्या स्फोटाचा आवाज खुप मोठा होता. घर थोडक्यात बचावले. पत्नीने जर तात्काळ येऊन मोबाईलची आग विझवली नसती तर खूप मोठी हानी झाली असती.मोबाईल स्फोट कसा होतो, तो आम्ही अनुभवलेला आहे. कुणीही चार्जिंगवर लावून मोबाईल पाहू नये व विशेष करून मोबाईल लहान मुलांना देऊ नये. नाहीतर खूप मोठी नुकसान होऊ शकते, असे संजय टाले यांनी सांगितले.

## शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा ६६ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ अमरावती–** शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे आणि त्यांना आर्थिक सुरक्षा मिळावी यासाठी शासनाने अनेक महत्त्वाच्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज येथे केले. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या निमित्ताने पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे मुख्य शासकीय समारंभ आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे बोलत होते .विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

नागरिकांना मार्गदर्शन करण्यापूर्वी श्री. भुसे यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. श्री. भुसे म्हणाले, राज्याच्या अर्थव्यवस्थेत शेतकरी हा महत्त्वाचा घटक आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतून आतापर्यंत पावणे तीन लाख शेतकऱ्यांना १ कोटी ६५ लाख रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. तसेच, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतून ८६ शेतकऱ्यांना १ कोटी ७० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.राज्य शासनाने पारदर्शी आणि गतिमानतेचे धोरण स्वीकारले आहे. सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या सेवा मिळाव्यात यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजाचे समाधान शिबिर राबविण्यात येत आहे. राज्य शासनाने १०० दिवसांचा कृती कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने 'संवाद' हा ऑनलाइन प्लॅटफॉर्म तयार केला आहे. हा प्लॅटफॉर्म नागरिकांना समस्या मांडण्यासाठी उपलब्ध करून दिलेला आहे. जिल्हा प्रशासनाला 'मिशन २८



मेळघाट ' आणि महिला व बाल संरक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ही बाब प्रशंसनीय आहे. अमरावतीच्या विकासासाठी विमानतळ सुरू झाले आहे. याशिवाय या ठिकाणी दक्षिण आशियातील सर्वात मोठे पायलट प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. शहरात वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करून यावर्षीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे .

राज्य शासनाने सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवा विहित वेळेत मिळाव्यात यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. येत्या १५ ऑगस्टपर्यंत राज्यातील सर्व शासकीय सेवा ऑनलाईन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. सध्या सेवा हमी विधेयकाला दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. सौर ऊर्जा प्रकल्पांवर भर देण्यात येत आहे. प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेत जिल्ह्यात १० हजार २७३ ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले आहेत, ज्यामुळे ४३.७३ मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता निर्माण झाली आहे. राज्यात नवीन शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात झाली आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार कार्यवाही करत, राज्य अभ्यासक्रमात सीबीएसईच्या चांगल्या गोष्टींचा समावेश केला जाणार आहे. शाळांमध्ये पायाभूत सुविधा आणि डिजिटल शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जात आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती हुतात्म्यांच्या बलिदानातून झाली आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने महाराष्ट्र आणि मराठी भाषेचा अभिमान बाळगावा, असे आवाहन श्री. भुसे यांनी केले.

*पुरस्कार वितरण सोहळा*

विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला . श्रुतिका औगड व उन्नती ओगले ( गोल्डन रो चाचणी परीक्षेत यशस्वी झाल्याबद्दल), अक्षय पंत (प्रामाणिकपणा व सचोटी ), योगेश ठाकरे (फायरमन), सय्यद अन्वर सै अकबर (लीडिंग फायरमन), प्रीती ठाकरे ( अवैध गौण खनिज विरुद्ध कार्यवाही), पोलीस आयुक्तालयातील दिनेश नेमाडे, अली खुर्शीद अली सय्यद, विनोद सिंग चव्हाण, संगीता सिरसाम यांना उत्कृष्ट कार्याबाबत गौरविण्यात आले.प्रारंभी विविध शासकीय विभागामार्फत परेड संचलन करण्यात आले. मंत्री श्री. भुसे यांनी परेड संचलनाचे निरीक्षण केले. परेडचे संचलन परेड कमांडर उपविभागीय पोलीस अधिकारी शिवम विसापूरे, राखीव पोलीस निरीक्षक श्रीधर गुळसुदरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन देशमुख यांनी केले.

## महाराष्ट्र व कामगार दिनी केला खासदार यांनी कामगार व अधिकारी मॅडम यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२दर्यापूर** – संपूर्ण महाराष्ट्रभर कामगार दिन व महाराष्ट्र दिन एक मे वेगवेगळ्या कार्यक्रमाद्वारे साजरा होत असताना दर्यापूर येथील श्री संत गाडगे महाराज बालगृह दर्यापूर येथे सुद्धा कामगार दिन व महाराष्ट्र दिन एका आगळ्यावेगळ्या उपक्रमाने साजरा करण्यात आला सर्वप्रथम महाराष्ट्र दिनानिमित्त खासदार यांच्या विनंतीनुसार महिला बाल विकास अधिकारी कार्यालयातील परिविक्षा अधिकारी श्रीमती व्ही एस चोरे (कोलखेडे) यांच्या हस्ते ध्वज पूजन ध्वजारोहण करण्यात आले व त्यानंतर कामगार दिन असल्यामुळे संपूर्ण आयुष्य मजीप्रामध्ये काम करणारे व आजही सेवानिवृत्त झाल्यावर आजही कार्यरत असलेले श्री दामू महाराज शर्मा यांचा खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते रोहिणी फाउंडेशन दर्यापूरचे अध्यक्ष किशोर ठाकूर, खोल्हापूर ग्रामपंचायत सदस्य सौ अलका निलेश पारडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शाल श्रीफळ पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला व त्याच वेळेस उत्कृष्ट अधिकारी म्हणून यांचा मुंबई येथे सत्कार झाला त्या महिला बाल विकास अधिकारी कार्यालय अमरावती येथील परिविक्षा अधिकारी यांना (बालस्नेही पुरस्कार २०२५ )श्रीमती व्ही एस चोरे (कोलखेडे) यांचा सुद्धा खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते शाल श्रीफळ बुके देऊन सत्कार करण्यात आला त्यानंतर बालगृहातील मुलांना काला जामून चिवडा व बिस्कीट पुढे



अलका निलेश पारडे, श्रीमती चोरे (कोलखेडे) बालगृहाच्या सौ रितिका वैभवराव देशमुख यांच्या हस्ते वाटण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार रोहिणी फाउंडेशनचे मार्गदर्शक गजानन देशमुख यांनी मानले त्याप्रसंगी श्रीकांत पळघामोळ, रुग्णसेवक सचिन शेलारे, माऊली फोटो स्टुडिओ संचालक विठ्ठल भांडे, बालगृह अधीक्षक राहुल ठाकरे, दामू महाराज व इतर उपस्थित होते सत्काराबद्दल बोलताना श्रीमती चोरे मॅडम म्हणाल्या की माझा सत्कार माझ्या लोकांनी व माझ्या गावात व्हावा यापेक्षा कुठलाही मोठा सत्कार असू शकत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले त्याचबरोबर कामगार दामू महाराज शर्मा यांनी ४५ वर्षानंतर प्रथमच या जागेत आलो सत्कार होणाऱ्या जागेवर मला खूप आनंद झाला.

## खरीप पीकविम्याचे ३,२६५ कोटी शासनाने केले मंजूर; लातूर जिल्ह्याला मिळाला सर्वाधिक निधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती** – यंदाच्या पंतप्रधान खरीप पीक विमा योजनेतून हंगामात स्थानिक नैसर्गिक आपत्ती, तसेच प्रतिकूल परिस्थितीत झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना ३ हजार २६५ कोटी रुपयांची भरपाई मंजूर करण्यात आली आहे.

आतापर्यंत २ हजार ५४६ कोटी रुपयांची नुकसानभरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली असून, उर्वरित ७१९ कोटी रुपये लवकरच




संबंधित शेतकऱ्यांना देण्यात येतील, अशी माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.यंदाच्या खरीप पीक

| मंजूर | नुकसानभरपाई | वितरण | शिल्लक (कोटींत) |
|---|---|---|---|
| नाशिक | १४९.८८ | १०२.७२ | ४७.१५ |
| पुणे | २८२.९९ | १३३.५५ | १६९.४४ |
| कोल्हापूर | १५.४९ | ९.६७ | ५.८२ |
| संभाजीनगर | ५६४.१८ | ४०४.११ | १६०.०७ |
| लातूर | १४०४.१२ | १२६३.३५ | १४०.७६ |
| अमरावती | ६२९.०४ | ४३३.३६ | १९५.६८ |
| नागपूर | २१९.६३ | २१९.२८ | ३५.०१ |

विमा योजनेत एक रुपयात विमा उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यानुसार स्थानिक नैसर्गिक आपत्तीत राज्यातील शेतकऱ्यांना २ हजार ५५२ कोटी ६० लाख रुपये तर हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेल्या नुकसानीपोटी ७१२ कोटी ७५ लाख रुपये, असे एकूण ३ हजार २६५ कोटी ३६ लाख रुपये राज्य सरकारने मंजूर केले आहेत.यात सर्वाधिक १ हजार ४०४ कोटी १२ लाख रुपये एकट्या लातूर विभागात मंजूर करण्यात आले आहेत. त्यातील ६९१ कोटी ३६ लाख रुपये स्थानिक नैसर्गिक आपत्तीतून तर ७१२ कोटी ७५ लाख हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेल्या नुकसानीपोटी देण्यात येणार आहेत.त्या खालोखाल ६२९ कोटी ४ लाख रुपये अमरावती विभागात शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी मंजूर करण्यात आले आहेत. या विभागात

**विभागनिहाय एकूण**

| | | |
|---|---|---|
| मंजूर नुकसानभरपाई | – | ३२६५.३६ |
| वितरण | – | २५४६.०६ |
| शिल्लक (कोटींत) | – | ७१९.२९ |

स्थानिक आपत्तीतून झालेल्या नुकसानीपोटी हा निधी मंजूर करण्यात आला आहे.

प्रतिकूल परिस्थितीतून झालेल्या नुकसानीपोटी भरपाई

कृषी विभागाने आतापर्यंत २ हजार ५४६ कोटी ६ लाख रुपयांचे वितरण केले आहे त्यातील १ हजार ८४४ कोटी ४४ लाख रुपये स्थानिक आपत्तीत झालेल्या नुकसानीपोटी तर ७०१ कोटी ६२ लाख रुपयांची नुकसानभरपाई हंगामातील प्रतिकूल परिस्थितीतून झालेल्या नुकसानीपोटी देण्यात आली आहे. तर, उर्वरित ७१९ कोटी २९ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही सुरू असल्याचे कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी स्पष्ट केले.

# पंकजा मुंडेंना कॉल अन् पाठवला अश्लील मेसेज

## पुण्यातील तरुणाला पोलिसांनी केली अटक




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२पुणे**

राज्याच्या पर्यावरण मंत्री आणि भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांना अश्लील मेसेज केल्याच्या प्रकरणात एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. सायबर पोलिसांच्या पथकाने पुण्यात राहत असलेल्या व्यक्तीला बेड्या ठोकल्या. कॉल करून आणि मेसेज पाठवून त्रास दिल्याच्या प्रकरणात ही कारवाई करण्यात आली.

अमोल काळे (वय २५) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याची चौकशी केली. त्याने आपणच पंकजा मुंडेंना कॉल आणि मेसेज केल्याची कबुली दिली. त्याला पुण्यातील भोसरी येथे अटक करण्यात आली.

पुण्यातील आरोपी मागील काही दिवसांपासून पंकजा मुंडे यांना वारंवार कॉल करून आक्षेपार्ह बोलत होता. त्याचबरोबर अश्लील मेसेजही पाठवून त्रास देत होता. या प्रकरणी भाजपच्या मुंबईतील प्रदेश कार्यालयातील सोशल मिडिया समन्वयक निखिल भामरे यांनी पोलिसांत तक्रार दिली.

निखिल भामरे यांनी मुंबई नोडल सायबर पोलिसांकडे यासंदर्भात तक्रार दिली आणि पोलिसांचे या प्रकाराकडे लक्ष वेधले. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ७८ आणि ७९ नुसार गुन्हा दाखल केला. अमोल काळे याला पुण्यातील भोसरी येथून अटक करण्यात आली. पण तो मूळचा बीड जिल्ह्यातील परळी येथील असल्याचीही माहिती आहे, पण याबद्दल दुजोरा मिळू शकलेला नाही.

# जातनिहाय जनगणनेला संघाने दीड वर्षा अगोदरच दाखविली हिरवी झेंडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेबाबत घोषणा केली आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका काय याकडे राजकीय व सामाजिक वर्तुळाच्या नजरा लागल्या. केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी यांनी जे देशासाठी आवश्यक आहे ते सर्व करावे, असे वक्तव्य नागपुरात केले. मात्र संघाकडून जनगणनेच्या समर्थनार्थ आलेले हे पहिलेच वक्तव्य नव्हते. प्रत्यक्षात संघाने दीड वर्षाअगोदरच जातनिहाय जनगणनेला हिरवी झेंडी दाखविली होती. जातनिहाय जनगणना ही मागास समाजाच्या विकासासाठी व्हावी, अशीच भूमिका संघाने २०२३ साली मांडली होती.



जातनिहाय जनगणनेला संघाचा विरोध आहे, या चर्चांना २०२३ मध्ये उधाण आले होते. संघाच्या विदर्भातील एका पदाधिकाऱ्याने केलेल्या वक्तव्यामुळे वाद निर्माण झाला होता. जातीनिहाय जनगणना झाल्यास कमी संख्या असलेल्या समाजाच्या मनात न्यूनगंड किंवा जास्त संख्येने असलेल्या समाजात प्रभुत्वाची भावना निर्माण होईल, अशी भूमिका संबंधित पदाधिकाऱ्याने मांडली होती. याबाबत सखोल विचार व्हावा असेदेखील ते म्हणाले होते. त्यांनी केवळ काही शक्यता बोलून दाखविल्या होत्या व जातनिहाय जनगणनेचा विरोध केला नव्हता; परंतु त्यांच्या वक्तव्याचा विपर्यास झाला होता व संघावर टीका सुरू झाली होती. तेव्हा संघाचे अखिल भारतीय प्रचारप्रमुख सुनील आंबेकर यांनी संघाचा जातनिहाय जनगणनेला विरोध नसल्याचे स्पष्ट केले होते. समाजातील अनेक घटक विविध कारणांमुळे अद्यापही मागासलेले आहेत. त्यांच्या विकासासाठी व सशक्तीकरणासाठी सरकार वेगवेगळ्या योजना व उपक्रम राबविते व संघाकडून त्याचे समर्थनच करण्यात येत आहे. जातनिहाय जनगणना झाली तर त्याचा उपयोग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी झाला पाहिजे. सोबतच असे करत असताना सामाजिक समरसता व एकात्मतेला धक्का लागणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. संघाच्या पदाधिकाऱ्यांनी जातनिहाय जनगणनेच्या निर्णयावर प्रतिक्रिया दिली नसली तरी डिसेंबर २०२३ च्या त्या भूमिकेवर आजदेखील आम्ही ठाम आहोत, असे एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने सांगितले.

# उद्या अमरावतीत आंतरराष्ट्रस्तरीय लावणी स्पर्धा

## धनश्री सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठाण अमरावतीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

शहरातील रहाटगांव-नागपूर रोडस्थित जिजाऊ प्रतिष्ठाण, मराठा नगरी अमरावती येथे आज ३ मे रोजी सायंकाळी ६ वाजता आंतरराष्ट्रस्तरीय लावणी स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र दिनाच्या पर्वावर धनश्री सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठाण अमरावतीच्या वतीने करण्यात आले आहे.या लावणी स्पर्धेचे हे पाचवे वर्ष असून कलेला वाव मिळावा या उद्देशाने हि स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये भरगच्च बक्षिसे देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन आ.सुलभाताई खोडके यांच्या हस्ते होईल.अध्यक्ष म्हणून विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्य स्मिताताई देशमुख यांच्यासह आदींची उपस्थीती राहणार आहे. या कार्यक्रमात प्रकाश




राऊत, सतीश यादव, अर्चनाताई सवाई यांचा सत्कारसमारंभ आयोजित करण्यात आला आहे. तरी या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन मंजू ठाकरे, कुंदा पुसदकर, आरती बोंदरकर, सुचित्रा लहाने यांच्यासह आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.




# सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सवाला अमरावतीकरांचा अलोट प्रतिसाद

## ऋषिकेश रानडे, अनिरुद्ध जोशी व आनंदी जोशींच्या स्वरात रसिक न्हाऊन निघाले! 'अजूनही चांदरात आहे ....'ला हजारो रसिकांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

सोमेश्वर पुसतकर सांस्कृतिक महोत्सवांतर्गत आयोजित 'अजूनही चांदरात आहे ...' या मराठी व हिंदी गीतांच्या कार्यक्रमाला अमरातीकरांनी अलोट प्रतिसाद दिला. ऋषिकेश रानडे, अनिरुद्ध जोशी व आनंदी जोशी या नामवंत मराठी गायकांच्या स्वर मैफिलीत हजारो संगीतप्रेमी न्हाऊन निघाले. सोमेश्वर पुसतकर मित्र मंडळ, आम्ही सारे फाउंडेशन व आझाद हिंद मंडळातर्फे संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात आयोजित या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांची उत्स्फूर्त गर्दी होती प्रेक्षकांच्या गर्दीने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन फुलून गेले होते , गॅलरी फुल झाली होती, लोकांसाठी बाहेरून खुर्च्या मागवल्या जात होत्या त्यासुद्धा लगेच संपत होत्या, रसिक प्रेक्षक मिळेल तेथे बसून कार्यक्रमाचा आस्वाद घेत होते. ज्यांना खाली जमिनीवर बसायला सुद्धा मिळाले नाही ते दाटीवाटीने एकमेकांचा सहारा घेत उभे राहून कार्यक्रमाचा आस्वाद घेत होते. भवनाच्या बाहेर सुद्धा रसिक प्रेक्षकांची उपस्थिती शेवटपर्यंत कायम होती.श्री गणेशाला स्मरून मोरया मोरया... ने केलेली सुरवात सूर निरागस हो... म्हणत या मैफिलीला सुरुवात झाली. सूर निरागस हो.. म्हणताना अनिरुद्ध जोशींनी सर्वांना मंत्रमुग्ध केले , लगेच अबीर गुलाल म्हणत सुरांचे रंग त्यांनी मनमोहकपणे उधळले. त्यानंतर आनंदी जोशी यांनी 'असे कसे बोलायचे? म्हणत चौफेर सुरांचा आनंद पसरवला . स्व.



सुरेश भट व सोमेश्वर भाऊ यांच्या आठवणीत 'सुन्या सुन्या मैफलीत माझ्या...' हे गाणे सादर करताना खरोखर त्या दोघांच्या विना मैफल सुनी सुनी असल्याचा भास झाला. काही क्षण उदास झालेल्या मनाला आनंदी जोशीने 'मेंदीच्या पानावर...' अलगदपणे झुलविले. अजून तुझे हळदीचे अंग अंग पिवळे ग... म्हणत असताना तिने 'तेरे बिना जिया जाये ना...' हे गीत सुमधुररित्या सादर केले. मग ऋषिकेश रानडे यांनी 'कधी तू .रिमझिममणारी बरसात... म्हणत 'तेरे नाम से जी लू... तेरे नाम से मर जावू....' हे गीत ताकदीने सादर केले. सुरांच्या ह्या बुलेटट्रेन मध्ये त्याने 'मेरे सपनोकी रानी कब आयोगी...' म्हणत संपूर्ण माहोल मस्ताना केला. त्या माहोल मधेच अनिरुद्ध जोशी ने 'अभी मुझे है कही बाते थोडीसी है जिंदगी...व मितवा.... कहे धडकने तुझसे क्या हे गाणे सादर केले. त्यानंतर त्याने संपूर्ण सभागृहाला त्याच्या सोबत 'राधा हि बावरी...' हे गीत गायला लावले. संपूर्ण रसिक प्रेक्षकांनी त्याच्यासोबत या गीताचा आनंद अक्षरशः लुटला. तिकडे राधा थोडी बावरी झाल्याबरोबर ऋषिकेश रानडे यांना राहवले नाही आणि तो 'मन उधाण वाऱ्याचे... म्हणू लागला. त्याच वातावरणात त्यांनी देशप्रेमाचीभावना जागवणारे 'मेरा रंग बसंती चोला' सादर केले. मग ऋषिकेश रानडे ह्यांनी 'दिवाना हुवा बादल...' म्हटल्या बरोबर आनंदी जोशीने त्याला 'जरा होले होले, चलो साजना हम भी पीछे है तुम्हारे...' ची आठवण करून दिली. मग आनंदी जोशी यांची गाडी सुसाट निघाली 'कजरा मोहब्बत वाला... अखियोमे ऐसे डाला हे... सांगत असताना तिने 'ये मेरा दिल प्यार का दिवाना... म्हणत सभागृहाला ताल धरायला लावला. यावेळेस वाद्यवृंदाने दिलेली साथ म्हणजे निव्वळ अप्रतिम होती.

त्यानंतर ऋषिकेश आणि आनंदी ह्यांनी 'एक मैं और एक तू... , दोनो मिले किस तरह... हे सांगितले. मग मागे राहील तो अनिरुद्ध कसला... त्याने सुद्धा 'अश्विनी ये ना.... म्हणत साद घातली. जगू कसा तुझ्या विना मी राणी ग...म्हणताच आनंदीने गाण्यात त्याला साथ दिली त्याही गाण्याला रसिक प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. त्यानंतर 'बदन पे सितारे लपेटे...'हे गाणे अनिरुद्ध ने त्याच्या एवढेच सभागृहाला म्हणायला लावले आणि रसिक प्रेक्षकांनी सुद्धा त्यास उस्फूर्त अशी साथ दिली. ऋषिकेश रानडे ने नंतर अमरावतीच्या अंबा देवीला साकड घातलं व अंबा देवीचा जागर करत 'आई उदो उदो आज गोंधळला ये...' भक्तिभावाने सादर केले. आनंदी जोशीने 'आता वाजले की बारा...' या लावणीवर सर्वांना ठेका धरायला लावला. कार्यक्रमाची सांगता करतांना आनंदी जोशी , अनिरुद्ध जोशी व ऋषिकेश रानडे ह्यांनी एकत्रितपणे 'विठ्ठलाचा गजर...' करत विठू माऊलीला साद घातली व 'माऊली माऊली...' हे गीत सादर करत सर्वात शेवटी विठू नामाचा गजर करत कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला.

# पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचे आगामी काळातील कामही सहकाऱ्यांना प्रेरणा देणारेच असावे - मुख्य अभियंता श्री.ज्ञानेश कुलकर्णी

## परिमंडळातील ४९ तांत्रिक कर्मचाऱ्यांचा गुणवंत कामगार म्हणून सन्मान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनानिमित्त विजेसारखी अत्यावश्यक सेवा देतांना अपघात विरहीत सेवा, ग्राहक समाधान,वसुली अश्या विविध निकषावर खरे उतरलेल्या परिमंडळातील ४९ तांत्रिक कर्मचाऱ्यांना गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ग्राहक समाधान हे महावितरणचे ब्रिद् वाक्य आहे. त्यामुळे पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांचे आगामी काळातील कामही सहकार्यांना प्रेरणा देणारे असेल आणि इतर कर्मचारी त्या कामाचे अनुकरण करतील असे आवाहन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.महावितरणमध्ये महाराष्ट्र दिन कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.विद्युत भवन येथे ध्वजारोहण झाल्यानंतर महावितरणचे विभागीय प्रशिक्षण केंद्र येथे आयोजित गुणवंत कामगार पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख,कार्यकारी अभियंता प्रशासन प्रदिप पुनसे,उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे,कार्यकारी अभियंते अनिरूध्द आलेगावकर,संजय सराटे,राजेश माहुलकर,उपविधी अधिकारी प्रशांत लहाने,अतीरिक्त कार्यकारी अभियंता राजेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना मुख्य अभियंता म्हणाले की,अत्यावश सेवा क्षेत्रात काम करतांना कर्मचाऱ्यांनी ग्राहकाप्रती संवेदनशिल असणे गरजेचे आहे. महावितरणच्या तांत्रिक अडचणी निश्चितच आहे,परंतू ग्राहकांचे कॉल घेत त्यांच्याशी सौजन्याने वागा,त्यांना वास्ताविकता सांगितली तरी ग्राहकांचे समाधान होते.महावितरणचे काम हे ऑन ड्यूटी २४ तासाचे आणि अत्यंत धोक्याचे आहे. एक चुकही शेवटची ठरू शकते, कोणत्याही संस्थेतिल कर्मचाऱ्यांची तत्काळ रिप्लेसमेंट होते,परंतू कुटूंबातील मानसाची रिप्लेसमेंट होत नाही.याची जाणीव ठेवा आणि जबाबदारीने काम करा,तीन अर्थींग रॉडचा कायम वापर करा असे भावनिक आवाहन यावेळी त्यांनी केले.परिमंडळातील ४९ पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांमध्ये अमरावती जिल्ह्यातील २७ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.त्यामध्ये प्रत्येक उपविभागातील एक तंत्रज्ञ असे २३ तंत्रज्ञ आणि प्रत्येक विभागातून एक यंत्रचालक अश्याप्रकारे ४ यंत्रचालक. यवतमाळ जिल्ह्यातील गुणवंत पुरस्काराने सन्मानित २२ कर्मचाऱ्यांमध्ये १८ तंत्रज्ञ आणि चार यंत्रचालकाचा समावेश आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक अधिकारी मधुसूदन मराठे यांनी केले आणि सुत्रसंचालन आणि आभार प्रविण वाट यांनी मानले.

# अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचा सर्वोत्तम जिल्हाधिकारी म्हणून गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अकोला**

राज्य शासनाच्या १०० दिवस कार्यालयीन निवडणूक मोहिमेत जिल्हयातील सर्वोत्कृष्ट करीत आहे.



ए आ य , अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करून तंत्रज्ञान अर्ज व निवारण प्रणाली, अभ्यागत सुविधा, गुणवत्तेसाठी प्रोत्साहन, गुण ई-ऑफिस प्रणालीचा १०० टक्के वापर, अला महाखनिज अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम अकोला जिल्हा प्रशासक हा गौरव प्राप्त झाले आहे.

थेट महाराष्ट्रदिनी ही क्रमवारी केली. सर्वोत्तम जिल्हा जिल्हाकाधि-यांमध्ये अकोजित लोकसहभागी कुंभार समाविष्ट करण्यात आला आहे. मुख्यमंत्री मंत्री आहे सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. तसेच राज्याचे संचालक मंत्री व पालकमंत्री ड. आकाश फुंडकर यांनीही श्री. कुंभार यांचे अभिनंदन केले.

भारतीय गुणवत्ता संपूर्णपणे मोहिमेचे मूल्यांकन करण्यात आले. संकेतस्थळ उभारणी कार्यालयीन सोयी सुविधा, निवारण व्यवस्था, सोयी सुविधा, नागरिकांसाठी सुविधा, तंत्रज्ञानाचा वापर, सुकर सुविधा, जीवनकार्यालयीन व्यवस्थापन आदि १० निश्चित होते.

# डॉ. राज यावलीकर यांच्या 'गाव विकणे आहे' कथासंग्रहाला चार राज्यस्तरीय पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

सुप्रसिद्ध साहित्यिक,कवी डॉ. राज यावलीकर यांच्या गाव विकणे आहे या कथासंग्रहाला सन २०२५ चा राज्यस्तरीय शिवांजली साहित्य गौरव पुरस्कार चाळकवाडी पुणे , राज्यस्तरीय अक्षरसागर साहित्य पुरस्कार गारगोटी कोल्हापूर, राज्यस्तरीय प्रज्ञा साहित्य पुरस्कार पुणे , तसेच रेडीयंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्डचा राष्ट्रगौरव पुरस्कार इत्यादी चार राज्य स्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे

त्यांनी कादंबरी, एकांकिका, कविता, कथा, बालवाड्.मय , संपादित साहित्य , संकिर्ण, कला इत्यादी विविध मराठी वाड्.मय प्रकारात लेखन केले आहे. गुलदस्ता या हिंदी कविता संग्रहासह त्यांचे मराठी मध्ये छोटे मोठे एकुण २७ पुस्तके प्रकाशित झालेली असून चार पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्यांच्या साहित्यावर विद्यार्थी विद्यापीठात शोध प्रबंधाचा अभ्यास करीत आहेत. त्यांना त्यांच्या साहित्य, चित्रकला व शिल्पकला इत्यादी श्रेत्रातील भरीव कार्याबद्दल जीवनगौरव , राष्ट्रगौरव पुरस्कारासह आतापर्यंत अठरा राज्यस्तरीय व राष्ट्रस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. डॉ. राज यावलीकर यांचे गीत, गझल व अभंगगझलगंधर्व सुधाकर



कदम, गझलरत्न डॉ. राजेश उमाळे यांनी संगीतबद्ध केले असून मा.पद्मश्री सुरेश वाडकर, डॉ. राजेश उमाळे, महागायिका धनश्री देशपांडे, मयूर महाजन, गौरवी उमाळे, शाम गवळीकर ईत्यादि सुप्रसिद्ध गायक, गायिकांनी गायिलेल्या आहेत. ' आकाश वेल फुलली ' हा त्यांचा गीत गझलांचा अल्बम प्रसिद्ध झाला आहे. त्यांचा गाव विकणे आहे हा १६० पृष्ठ व २५ कथांचा कथासंग्रह मेधा पब्लिशिंग हाउस, अमरावती यांनी प्रकाशित केला असून या कथासंग्रहाला मा. डॉ.श्रीपाल सबनीस, डॉ. रा. गो. चवरे, डॉ. प्रतिमाताई इंगोलेयांची प्रस्तावना व अभिप्राय लाभला असून श्रीमान बाबाराव मुसळे यांच्या ब्लर्ब आहे. या कथासंग्रहातील सर्वच कथा सुप्रसिद्ध वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत व वाचकांच्या पसंतीस उतरल्या आहेत. ते श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचलित, जनता कृषी तंत्र विद्यालय अमरावतीचे माजी प्राचार्य असून यावली शहिद स्मारक समिती ( शिक्षण संस्था ) यावली चे विद्यमान अध्यक्ष आहेत.ते जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद शाखा अमरावती चे अध्यक्ष आहेत , तसेच प्रा. मधुकर केचे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.त्यांच्या या विविध साहित्य पुरस्कार, व सन्मानाबाबत त्यांच्या साहित्यिक मित्र मंडळींनी, नातेवाईकांनी व वाचकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे .

# खा. अरविंद सावंत यांच्या नेतृत्वात ट्रॅक्टर मोर्चा धडकला जिल्हाधिकारी कार्यालयावर

## मोर्चा दरम्यान कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या प्रतिमेला चपलांचा हार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे आज २ मे रोजी भव्य ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.खासदार अरविंद सावंत, शिवसेनेचे आमदार, उपनेते, माजी खासदार, युवा सेना, महिला आघाडी, युवती सेना, कामगार सेना आणि सहकार सेनेचे पदाधिकारी या मोर्चात सहभागी झाले होते.



गाडगेनगर येथील संत गाडगे बाबा समाधीपासून सुरू झालेला हा मोर्चा पंचवटी चौक, गर्ल्स हायस्कूल चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चा दरम्यान कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या प्रतिमेला चपलांचा हार घालण्यात आला तसेच चप्पल-जोड्यांनी मारण्यात आले. मोर्चात शेकडो शिवसैनिक ट्रॅक्टरसह सहभागी झाले होते. यावेळी राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या मोर्चाचे नेतृत्व शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत यांनी केले. त्यांच्यासोबत आमदार गजानन लवटे, माजी खासदार अनंतराव गुढे व इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी करू असे आश्वासन दिले होते, मात्र अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतमालाला योग्य हमीभाव देण्याची मागणी मोर्चाच्या माध्यमातून करण्यात आली. कर्जमाफी तातडीने न दिल्यास आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा खासदार अरविंद सावंत यांनी यावेळी दिला.

# आतुरता आषाढी वारीची! माऊलींच्या जयघोषात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे १९ जूनला प्रस्थान

## ५ जुलैला माऊलींची पालखी पंढरपूर येथे पोहोचणार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२आळंदी

यंदा संत ज्ञानेश्वर महाराज सोहळा आषाढी पायीवारीसाठी १९ जूनला आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार असल्याची माहिती पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे यांनी दिली. प्रथा - परंपरेनुसार १९ जूनला रात्री आठच्या सुमारास वाजत - गाजत माऊलींच्या पालखीचे समाधी मंदिरातून प्रस्थान होईल.

दर्शनबारी मंडपात (आजोळी) माउलींचा पहिला मुक्काम असणार आहे. २० जून व २१ जूनला पालखी सोहळा पुण्यनगरीत मुक्कामी राहील. दि. २२ व २३ जूनला सासवड,




त्यानंतर २४ जूनला जेजुरी, २५ जूनला वाल्हे, त्यानंतर नीरा स्नाननंतर २६ जूनला पालखी सोहळा लोणंद येथे मुक्कामी जाईल. दोन दिवस पालखीचा मुक्काम होता. मात्र यंदा लोणंदला एकच दिवस पालखी मुक्कामी असेल. त्यानंतर २७ जूनला चांदोबाचा लिंब येथे पहिले उभे रिंगण सोहळा साजरा करून पालखी तरडगाव मुक्कामी जाईल. २८ जूनला फलटण, २९ जूनला बरड, ३० जूनला नातेपुते, १ जुलैला पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण घेऊन पालखी माळशिरसला मुक्कामी जाईल. २ जुलैला सकाळचा विसावा असलेल्या खुडूस फाटा येथे दुसरे गोल रिंगण सोहळा घेऊन पालखी वेळापूर मुक्कामी जाईल. ३ जुलैला भंडीशेगाव, ४ जुलैला वाखरी तर ५ जुलैला पालखी सोहळा पंढरीत पोहचणार असून मुख्य आषाढी एकादशी सोहळा संपन्न होईल.

पंढरीत आषाढी एकादशीचा महासोहळा ६ जुलैला संपन्न होईल. पालखी सोहळ्यात चांदोबाचा लिंब येथे पाहिले उभे रिंगण, पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण, खुडूस फाटा येथे दुसरे गोल रिंगण, ठाकुरबुवाची समाधी येथे तिसरे गोल रिंगण, वाखरीच्या बाजीराव विहीर येथे दुसरे उभे व चौथे गोल रिंगण, इसबावी पादुकांजवळ पंढरपूर प्रवेशापूर्वी तिसरे उभे रिंगण होईल. त्यानंतर १० जुलैला पालखी परतीचा प्रवास सुरू करेल. ११ दिवसांचा पायी प्रवास करून पालखी सोहळा पुन्हा २० जुलैला आळंदीत दाखल होणार असल्याची माहिती व्यवस्थापक माऊली वीर यांनी दिली.

# जातनिहाय जनगणना: भाजप मोदींच्या अभिनंदनाचे ठराव राज्यभर घेणार, प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंची घोषणा



विदर्भ प्रजासत्ताक दि.२नागपूर

जातनिहाय जनगणना करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेला निर्णय क्रांतिकारी व ऐतिहासिक असल्याने महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीच्यावतीने पंतप्रधान मोदींच्या अभिनंदनाचा ठराव घेण्याची घोषणा प्रदेशाध्यक्षव अमरावती जिल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

विशेष म्हणजे, महाराष्ट्र दिनाला घोषणा करताना प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की, या क्रांतिकारी निर्णयाबद्दल महाराष्ट्र भाजपाने राज्यातील एक लाख १८६ बूथ आणि १,२८० मंडल समित्यांसह महाराष्ट्रातील २७ हजार ग्रामपंचायतींमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन ठराव करण्याचा निर्णय घेतला आहे.

देशात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक उत्क्रांतीचे नवे पर्व जातनिहाय जनगणनेमुळे सुरू होईल. जातनिहाय जनगणना लोकशाही मजबूत करणारा महत्तम टप्पा असून, पंतप्रधान मोदींच्या विकसित भारताच्याध्येयपूर्तीची पाऊलवाट अधिक पक्की होईल, ही खात्री आहे.

### गळाकाढू काँग्रेसी गप्प का?

जातीनिहाय जनगणनेसाठी गळा काढणारे शरद पवार साहेब, उद्धव ठाकरे, नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार आता गप्प का बसलेत आहेत? इतके दिवस जातीनिहाय जनगणना करा म्हणून घसा कोरडा करणारे नेते आता केंद्रातील मोदी सरकारच्या ऐतिहासिक निर्णयाबद्दल अभिनंदन करण्याचं औदार्य दाखवणार की नाक मुरडत घाणेरडं राजकारण करणार? हा सामान्य माणसाच्या मनातील सवाल आहे.

# रेल्वे तिकिटांचा काळाबाजार, अमरावतीत दलालाला रंगेहाथ पकडले

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती

मध्य रेल्वेकडून तिकिटांच्या बेकायदेशीर विक्रीविरोधात सातत्याने कडक कारवाई केली जात आहे. रेल्वेचे तत्काळ आरक्षण देण्यात होत असलेली दलाली थांबवण्यासाठी रेल्वे विभागाकडून प्रयत्न होत असले तरी दलालांचा सुकाळ आहे. नियमित प्रवाशांना आरक्षित तिकिटे उपलब्ध करून देण्याच्या सततच्या प्रयत्नांमध्ये, मध्य रेल्वेच्या रेल्वे संरक्षण दलाने (आरपीएफ) अनधिकृत तिकीट विक्रेत्यांवर कारवाईची मोहीम सुरू केली आहे.

अशाच एका कारवाईदरम्यान मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात आरपीएफने चांदूर रेल्वे स्थानकावर ऑपरेशन 'उपलब्ध' अंतर्गत एका अनधिकृत तिकीट विक्रेत्याला अटक केली. त्याच्याकडून ३ हजार ५१५ रुपयांची तिकिटे जप्त करण्यात आली असून रेल्वे कायद्याच्या कलम १४३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आरपीएफचे कर्मचारी चांदूर रेल्वे येथील या दलालावर नजर ठेवून होते. हा दलाल अनधिकृत पद्धतीने तिकिटांची विक्री करीत असल्याचा संशय आरपीएफच्या कर्मचाऱ्यांना होता. कर्मचाऱ्यांनी तत्काळ कारवाई करताना या अनधिकृत तिकीट विक्रेत्याला अटक केली.

आरपीएफ ही प्रवाशांची उत्तम सुरक्षा, प्रवाशांच्या सोयीसाठी आणि रेल्वे मालमत्तेच्या संरक्षणासाठी एक प्रमुख सुरक्षा आणि कायद्याची अंमलबजावणी करणारी संस्था आहे. रेल्वे संरक्षण दल आज रेल्वे आणि त्याच्या ग्राहकांच्या बदलत्या सुरक्षेच्या गरजा ओळखून काम करते. रेल्वे प्रवास सुखकर व्हावा म्हणून ही तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे, असे रेल्वे प्रशासनाने सांगितले आहे.

अनधिकृत दलालांकडून लांब पल्ल्याच्या गाड्यांचे मोठ्या प्रमाणात आरक्षण केले जाते. त्यामुळे सामान्य प्रवाशाला तिकीट उपलब्ध होत नाही. तत्काळ तिकिट मिळविण्यासाठी अनधिकृत दलालांकडून तिकीट खिडक्यांसमोर एकापेक्षा जास्त दलाल उभे केले जातात. आता तिकीट खिडक्यांवर लांब पल्ल्याच्या गाड्यांचे तिकीट काढण्यासाठी येणाऱ्या प्रवाशांवर विशेष लक्ष दिले जात आहे.

# जादूटोण्याचा आरोप करून विवाहितेची गावभर बदनामी; वरूड पोलिसांत तिघांवर गुन्हा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२वरुड

एका ५४ वर्षीय विवाहित महिलेवर जादूटोणा केल्याचा आरोप करून गावात बदनामी केल्याची घटना वरूड तालुक्यात घडली. 'तू कर्नाकटी आहेस', असे म्हणत महिलेला मानसिक त्रास देण्यात आला आणि तिची प्रतिष्ठा उध्वस्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रकरणी वरूड पोलिसांनी तीन जणांविरुद्ध जादूटोणा विरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.



ही घटना वरूड तालुक्यातील एका गावात घडली. पीडित महिला नेहमीप्रमाणे मंदिरात आरतीसाठी गेली असताना, आकाश पुंडलिक राऊत, पुंडलिक राऊत आणि कैलास पुंडलिक राऊत (सर्वजण रा. वरूड) या तिघांनी गावकऱ्यांसमोर ती जादूटोणा करते, अशी बदनामी केली. तिन्ही आरोपींनी तू सकाळीच करणी करायला गेली होतीस, तूच आमच्या घरच्यांवर जादूटोणा करतेस, असे म्हणत महिलेला लक्ष्य केले. इतकेच नव्हे तर आरोपींनी तिला जिवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप महिलेने केला आहे.

या संपूर्ण घटनेने पीडित महिला मानसिकदृष्ट्या खचली असून, शेवटी तिने वरूड पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र नरबळी व अघोरी प्रथा, जादूटोणा प्रतिबंध अधिनियम २०१३ अंतर्गत कलम ३(२) सह इतर कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास वरूड पोलीस ठाण्याचे ठाणेदार अर्जुन ठोसरे करीत आहेत.

वरूड पोलिसांनी दाखल केलेला हा गुन्हा यंदाच्या वर्षातील जादूटोणा प्रतिबंध कायद्यान्वये नोंदविण्यात आलेला पाचवा गुन्हा ठरला आहे. याआधी चिखलदरा पोलिसांनी १८ जानेवारी, २७ जानेवारी आणि २६ फेब्रुवारी रोजी अनुक्रमे तीन गुन्हे दाखल केले होते. तसेच गाडगेनगर पोलिसांनी बलात्कार प्रकरणात एका मांत्रिकावरही याच कायद्यानुसार गुन्हा दाखल केला होता. मेळघाटातील चिखलदरा व धारणी परिसरात अशा प्रकारच्या घटना वारंवार उघडकीस येत असून, आजही ग्रामीण भागात अंधश्रद्धा आणि अघोरी प्रथा कायम असल्याचे स्पष्ट होत आहे. आजारीपणासारख्या नैसर्गिक कारणांमागेही जादूटोणाच कारणीभूत ठरवत निष्पाप महिलांवर शारीरिक व मानसिक अत्याचार होतात, ही बाब सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत गंभीर मानली जात आहे.

### सामाजिक जागृतीची गरज

या प्रकरणाने पुन्हा एकदा अंधश्रद्धांविरोधातील लढ्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. अशा घटनांना आळा बसवण्यासाठी समाजातील सर्व स्तरांनी पुढे येऊन अंधश्रद्धा निर्मूलन आणि कायदा अंमलबजावणी यावर भर देणे गरजेचे असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

# मेळघाटात 'हायब्रोसिस्टम चिखलदरेंसीस' या नवीन कोळी प्रजातीचा लागला शोध

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२मेळघाट

उडी मारणाऱ्या कोळीच्या (स्पायडर) 'हायब्रोसिस्टम चिखलदरेंसीस' या नवीन प्रजातीचा शोध मेळघाटात लागला आहे. या कोळीचा शोध चिखलदरा येथे लागल्यामुळे कोळीच्या नावात चिखलदरा हा शब्द टाकण्यात आल्याचे संशोधकांनी सांगितले. या संशोधनाने मेळघाटातील जैवविविधतेच्या संपत्तीला नव्याने अधोरेखित केले आहे.

हे संशोधन 'सर्किट- द अरेक्नॉलॉजिकल बुलेटीन ऑफ द मिडल ईस्ट अँड नॉर्थ आफ्रिका' या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे. हे संशोधन येथील कोळी अभ्यासक डॉ. अतुल बोडखे आणि त्यांच्या लखनौ विद्यापीठातील संशोधक विद्यार्थिनी क्रितिका राव यांनी केलेले आहे. दर्यापूर येथील जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील कोळी संशोधन प्रयोगशाळेत या महत्वपूर्ण शोधावर शिक्कामोर्तब करण्यात आले.



'हॅब्रोसेस्टम जंपिंग स्पायडर' हे जमिनीवर राहणारे मांसाहारी जीव आहेत. आकर्षक देखाव्यासाठी आणि वर्तनासाठी, विशेषतः त्यांच्या अपवादात्मक दृश्य तीक्ष्णतेसाठी ते ओळखले जातात. भारतातील पश्चिम घाट आणि युरेशिया आणि आफ्रिकेच्या इतर भागांसह विविध अधिवासांमध्ये ते आढळतात, काही प्रजाती ऑस्ट्रेलिया आणि सोलोमन बेटांमध्ये आढळतात. या कोळीच्या जगामध्ये एकूण ५९ प्रजातीचा आजपर्यंत शोध लागलेला आहे त्यापैकी नऊ प्रजाती भारतात आढळतात. ते सामान्यतः विविध अधिवासांमध्ये आढळतात, ज्यामुळे ते परिसंस्थेच्या आरोग्याचे महत्त्वाचे सूचक बनतात.

निसर्गाचे चक्र संतुलित ठेवण्यासाठी कोळ्यांचा मोठा उपयोग होतो. त्यांचे मुख्य खाद्य किडे, जंतू असल्यामुळे शेतातील पिकांवरील तसेच झाडावरील किडे खाऊन त्यांचे रक्षण ते करत असतात. तर कोळी स्वत: पक्षी, सरडे आणि अन्य कीटकांचे खाद्य असल्याने निसर्गाचे चक्र अबाधित ठेवण्यासाठीही त्यांचा उपयोग होतो. कोळ्यांनी तयार केलेले जाळे वैद्यकीयदृष्ट्या महत्त्वाचे असते, असे डॉ. अतुल बोडखे यांनी सांगितले.

# लिंकिंगने वाढविला कृषी विक्रेत्यांचा ताप, महाराष्ट्रात रासायनिक खतांची खरेदी बंद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२अमरावती

खरीप हंगाम आता तोंडावर आहे. बळीराजाप्रमाणे कृषी विक्रेत्यांनी हंगामाची तयारी सुरू केली आहे. गेल्या काही वर्षांपासून विक्रेत्यांची मागणी नसताना कंपन्या खते लिंकिंग पद्धतीने माथी मारतात. लिंकिंगची खते शेतकरी घेण्यास उत्सूक नसतो. परिणामी दरवर्षी मोठा साठा विक्रेत्यांकडे शिल्लक राहतो. त्याचा भुर्दंडही विक्रेत्यांना बसत आहे. दरम्यान, कंपन्यांनी लिंकिंग बंद करावी या मागणीसाठी १ मे पासून रासायनिक खताची खरेदी पुर्णतः बंद करण्याच्या निर्णय माफदा (महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाईड्स, सीड्स डीलर्स असोसिएशन) ने घेतला आहे. त्यामुळे १ मे पासून राज्यात कंपनी कडून रासायनिक खतांची खरेदी बंद करण्यात आली आहे. दरम्यान या संदर्भात कृषी मंत्री माणिकराव



कोकाटे यांनी मुंबईत एक महत्वाची बैठक बोलावली आहे.

गेल्या काही वर्षांपासून कृषी विभागाची मान्यताप्राप्त रासायनिक खते उत्पादक व पुरवठादार कंपन्यांकडून खत विक्रेत्यांना युरिया आणि संयुक्त खतांचा पुरवठा करण्यात येतो. मात्र, विक्रेत्यांकडून मागणी नसतानाच इतर खते लिंकिंग पद्धतीने पाठविली जात आहे. लिंकिंग पद्धतीने पुरवठा झालेली खते शेतकरी घेण्यास फारसा उत्सूक नसतो. त्यामुळे दरवर्षी मोठा साठा विक्रेत्यांकडे पडून असतो. काही दिवसांपूर्वीच खताची लिंकिंग बंद होण्याबाबत कृषी विभागाचे प्रधान सचिव, आयुक्तांच्या उपस्थितीत कृषी आयुक्तालय पुणे येथे कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत माफदा संघटनेकडून खतामधील लिंकिंग बंद होत नसल्याबाबत मुद्दा उपस्थित केला होता.

कंपन्यांकडून खतामधील लिंकिंग बंद होईपर्यंत राज्यातील सर्व विक्रेत्यांनी रासायनिक खतांची खरेदी बंद करण्याची कार्यवाही करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला.


